जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 NOV 2017
तरुण भारत

# विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालये 'नॅक'मध्ये अग्रेसर

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) बेंगलोर समितीने देशभरातील महाविद्यालयांचा नॅक मूल्यांकनाचा निकाल जाहीर केला. यामध्ये शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयांना 'ए' मानांकन मिळालेले आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

देशभरातून ज्या महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनासाठी अर्ज केला आहे. अशा सर्वच महाविद्यालयांचे नॅकतर्फे मूल्यांकन करून नुकताच निकाल जाहीर केला. या मूल्यांकनामध्ये पहिल्या फेरीत आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (खानापूर, जि. सांगली) या महाविद्यालयाला नॅकचे 'बी' मानांकन. भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मोरेवाडी-कोल्हापूर (ए), डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी कसबा बावडा (ए), श्री अंबाबाई तालीम संस्था संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मिरज (ए) यांचा समावेश आहे. तर दुसऱ्या फेरीत शशिकांत शिंदे महाविद्यालय मेढा, सातारा (बी प्लस)डेक्कन एज्युकेशन सोसायटी विलिंग्डन कॉलेज (ए), लोकनेते हनुमंतराव चॅरिटेबल ट्रस्ट आदर्श कॉलेज विटा, सांगली (बी प्लस) असे मूल्यांकन मिळाले आहे.

तिसऱ्या फेरीत विद्यापीठ परिक्षेत्रातील १२ महाविद्यालयांचा समावेश आहे. भारती



विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई कदम कडेगाव, सांगली (ए), दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज हातकणंगले, कोल्हापूर (ए), कमला कॉलेज राजारामपुरी, कोल्हापूर (ए), महावीर महाविद्यालय कोल्हापूर (ए), रयत शिक्षण संस्थेचे डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, सातारा (ए), छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा (ए प्लस), राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर (ए), सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा (बी प्लस, प्लस), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पाचवड, सातारा (बी प्लस, प्लस), व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी (बी), यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड, सातारा (बी प्लस, प्लस), काकासाहेब चव्हाण महाविद्यालय तळमावले पाटण, सातारा (बी प्लस) श्रेणी मिळवली आहे. एकंदरीतच शिवाजी विद्यापीठ गुणवत्तेत अग्रेसर असल्याचे चित्र आहे.

**देशभरातील ११६ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन**

4 NOV 2017 Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK begins with NAAC re-accreditation process

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK), in an attempt to raise its National Assessment and Accreditation Council (NAAC) grading, has started with the re-accreditation cycle preparation from the last month.

Notably, the NAAC re-accreditation for the varsity is due in 2019. According to pro-VC of SUK D T Shirke, committees have been formed and the key areas are being looked after. "A steering committee that looks after other committees work is conducting regular meetings and concerned officials are busy completing the work," he said.

Shirke added that with the current activities every department, be it academic or administrative, has a ready-to-go data with them. "We are already preparing for the National Institutional Ranking Framework (NIRF) for 2018 and several other initiatives are in pipeline. We are quite sure to score excellent in the NAAC assessment," he said.

He added that the Internal Quality Assessment Cell (IQAC) is also functional in the varsity and had received praise from academicians in the past. It should be noted that before the third re-accreditation cycle was conducted way back in the year 2014, the varsity had a B-grade ranking. After the NAAC's successful report, varsity got its highest ever cumulative grade point average score of 3.16 that year — highest in the state — that earned varsity an A grade.

Meanwhile in 2016, the NAAC has revised its grading system, under which the four point grading system A, B, C and D has been replaced with seven point grading system-A++, A+, A, B++, B+, B, C and D. The varsity sources said that the authorities are aiming for the highest grading.

According to the new grading system, institutions that get CGPA 3.76 to 4 gets A++ grade, CGPA 3.51 to 3.75 (A+), CGPA 3.01 to 3.50 (A), CGPA 2.76 to 3 (B++), CGPA 2.51 to 2.75 (B+), CGPA 2.01 to 2.50 (B), and CGPA 1.51 to 2 (C).

The National Assessment and Accreditation Council (NAAC) is an autonomous body established by the University Grants Commission (UGC) to assess and accredit institutions of higher education across the country.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 NOV 2017
तरुण भारत

# गोखले कॉलेजमध्ये मंगळवारी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

गोखले कॉलेज, नॉलेज पार्टनर सेंटर फॉर इंटरडिसीप्लीनरी रिसर्च, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी आणि शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार ७ नोव्हेंबर रोजी 'विज्ञान व तंत्रज्ञानामधील नाविन्यपूर्ण संशोधन' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवारी गोखले कॉलेजमधील प्राचार्य एम. आर. देसाई ग्रंथालय हॉलमध्ये सकाळी १० वाजता या परिषदेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. तर बुधवार ८ नोव्हेंबर रोजी समारोप होणार आहे, अशी माहिती शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. देसाई-मोरे म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'विज्ञान व तंत्रज्ञानामधील नाविन्यपूर्ण संशोधन' या संदर्भातील आधुनिक घडामोडी या विषयावर तज्ज्ञ विचारवंत मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये संशोधनवृत्ती जागृत करण्याचा प्रयत्न या परिषदेच्या माध्यमातून केला जाणार आहे. चोन्नम नॅशनल विद्यापीठाचे प्रो. डॉ. जीम. हाईक किम, प्रो. डॉ. जे. जीन. शीम, प्रो. डॉ. दीपक दुबल (ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटी), प्रो. डॉ. टी. पी. गुजर (जर्मनी), प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ज्योती जाधव (शिवाजी विद्यापीठ), प्रो. डॉ. डी. एस. ढवळे कतार फौंडेशन कतार हे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

**डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांची माहिती**

गोखले कॉलेजमधील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी खासदार बॅ. अमर पाटील (कर्नाटक), डॉ. संजय डी. पाटील (डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष), डॉ. प्रभाकर भंडारी (विश्वशांती मल्टीपर्पज सोसायटी, नागपूर), शिवानी देसाई (अध्यक्षा शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर), शिवाजीराव सावंत (उपाध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर), प्रा. जयकुमार देसाई (सेक्रेटरी शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर), दौलतराव देसाई (पेट्रन कौन्सिल मेंबर शिक्षण प्रसारक मंडळ), आदी मान्यवर प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. तसेच देश-विदेशातील १९० संशोधक शिक्षक, विद्यार्थी आणि उद्योजक, ६ निमंत्रित व्याख्याते सहभागी होणार असून, ८९ शोधनिबंध व ९५ विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 NOV 2017
Times of India

# UGC asks universities to register on CPCSEA's portal

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked the universities and their affiliated colleges to register on the Committee for the Purpose of Control and Supervision of Experiments on Animals (CPCSEA) website.

The objective of the committee is to ensure that animals are not subjected to unnecessary pains or suffering before, during or after performance of experiments on them. For this purpose, the committee formulated the Breeding of and Experiments on Animals (Control and Supervision) Rules, 1998, which were amended in 2001 and in 2006.

The UGC said the website of CPCSEA has been launched and applications for registration are accepted online.

In 2011, the UGC had issued guidelines for discontinuation of dissection and animal experimentation in zoology and life science courses in a phased manner and has been sending frequent reminders to academic institutions since then.

The guidelines encourage use of books, models and films. For undergraduate programmes, students should not be required to dissect any animal. Post-graduate students can choose to dissect animals or opt for a project related to biodiversity and/or biosystematics.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2017
पुण्यनगरी

# राष्ट्रीय मोडी लिपी इतिहास प्रबोधिनीच्या प्रयत्नानंतर विद्यार्थी दिन जाहीर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्रातील २०० दस्ताऐवजांचे जतन करावे, बाबासाहेबांनी ज्या दिवशी शाळेत प्रवेश घेतला तो दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करावा, अशी मागणी डॉ. कृष्णा किरवले यांच्याकडे राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे उदयसिंह राजेयादव यांनी केली होती. तसेच आयसीएसएसआर, नवी दिल्ली यांच्या मदतीने नॅशनल कॉन्फरन्स ऑन जर्नलिस्टिक व्ह्यू ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड ईस्ट प्रेझेंट रिलेव्हन्समध्येही या जुन्या दस्तऐवजांचे जतन करण्याची मागणी करण्यात आली होती. जून २०१५ मध्ये सातारा येथे राजेयादव यांनी साताऱ्च्या प्रतापसिंग हायस्कूलमध्ये बाबासाहेबांची स्वाक्षरी आणि मोडी लिपीमध्ये प्रवेशाची नोंद असून, ती शाळेने चांगल्या पद्धतीने जपली आहे, हे निदर्शनास आणून दिले होते. यासाठी सातारा येथील अॅड. सौरभ देशपांडे यांनी त्यांना मदत केली होती. या सर्व प्रयत्नांची दखल घेत ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन साजरा करण्यात येणार असल्याचे राज्य शासनाने जाहीर केले आहे.